साक्षर शहर • सुंदर शहर • हिरवेगार शहर

जळगांव शहर महानगरपालिका

# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## विभाग : अतिक्रमण निर्मुलन विभाग

Scanned with OKEN Scanner

# जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

दिनांक:- 06 / 04 /2026

अतिक्रमण निर्मुलन विभाग

---

सविनय सादर

मा.आयुक्त यांचे कडील कार्यालयीन आदेश क्र.जा.क्र/जमपा/प्रमुख.कर./4270/2026 दिनांक:- 30/03/2026 अन्वये

**विषय**:-जळगाव महानगरपालिकेत प्रशासकिय राजवटीच्या कालावधीत घेण्यात आलेले निर्णय,मंजूर कामे,आर्थिक व्यवहार व प्रशासकिय कारभाराबाबत सविस्तर श्वेत पत्रिका [ White pepaer ] प्रसिध्द करण्याबाबत...

संदर्भ मा.सौ.दिपमाली अमित पाटील नगरसेविका प्रभाग क्र.13 यांचा अर्ज

उपरोक्त विषयानुसार अतिक्रमण निर्मुलन विभागाकडेस मनुष्य बळ कमी असल्याने याविभागाकडुन मनुष्य बळ मिळणे कामी दिनांक -26/11/2024 रोजी मागणी केली असता नियमा नुसार विविध विभागाकडुन लेखी समिती घेवुन मा.महासभेकडेस प्रस्ताव सादर केला असता मा.महासभा ठराव क्र.224 दिनांक:-15/01/2025 अन्वये ई निविदा प्रसिध्द करुन ठरेव मजुराच्या पगारावर येणारा खर्च रु.1,23,88,761/-मान्यता मिळाल्यानुसार ई निविदा प्रसिध्द करुन मक्तेदार रॅपिड सिक्युरिटी अँण्ड सर्व्हीसेस जळगाव यांनी निविदेतील अटीशर्तीची पुर्तता करुन ई निविदेत मागीतलेले सेवा शुल्क रु.1.00 /[ एक रुपया प्रति कामगार ] सर्वात कमी दिल्याने , त्यांना आवश्यकतेनुसार मजुर पुरविण्यासाठी कार्यदिश देणे साठी मा.स्थायी समिती [ प्रशासक ] क्र.255 दिनांक :- 30 / 04 /2025 अन्वये मान्यता मिळाली आहे.त्या नुसार मक्तेदार रॅपिड सिक्युरिटी अँण्ड सर्व्हीसेस जळगाव यांना जा.क्र/अति.नि.वि/07/2025-26 दिनांक:- 21/05/2025 रोजी 25 मजुरांचा पुरवठा दिनांक -01/06/2025 पासुन करावा असा कार्यदिश देण्यांत आलेला आहे.

सबब प्रकरणी दिनांक-26/11/2024 पासुन मजुर मागणी केलेली टिपर्णी ते दिनांक:-21/05/2025 रोजी दिलेला कार्यादिश पर्यंत टिपणीची छायांकित प्रत असे

तरी सदरची माहीती प्रमुख कार्यालयाकडेस रवाना होणेस सादर

संजय बन्सी पवार [ ठाकूर ]
अधिक्षक

मा.उपायुक्त

कार्यालय अधिक्षक



Scanned with OKEN Scanner

# जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव.

अतिक्रमण निर्मुलन विभाग

दिनांकः-26/11/2024

सविनय सादर,

अतिक्रमण निर्मुलन विभागाकडेस सदयस्थितीत मनुष्य बळ कमी उपलब्ध असल्याने सन-24/25 करीता सुध्दा अतिक्रमण निर्मुलन विभागास 35 मजुरांची आवश्यकता असल्याने सदर मनुष्य बळ घेणेसाठी मा.आयुक्त सो यांच्या दिनांकः-08/07/2024 रोजी ई निविदा मागविण्यांस मान्यता दिलेले आहे.

त्याअनुषंगाने सदरची बाब धोरणात्मक असल्याने तसेच मनुष्यबळासाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी मा.महासभेकडेस जा.क्र/अति.नि.वि/21/2024-25 दिनांकः-09/07/24 अन्वये डॉकेट सादर केले असता.मा.महासभा [ प्रशासक ठराव क्र.113 ] दिनांकः-19/07/24 अन्वये ठराव झाला की,यापुढे मनुष्यबळ पुरवठाची निविदा आस्थापणा विभागाकडुन करण्यांत येईल असे नमुद केले असता याविभागाकडुन आस्थापणा विभागाकडेस मनुष्यबळ पुरवठाची दोन वेळा मागणी केलेली आहे.

आस्थापना विभागाकडुन सदर बाबत मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेत आलेलेनाही.तरी याविभागात मनुष्यबळ नसल्याने अतिक्रमण विभागाची कोणतीही कार्यवाही प्रभावीपणे करता येत नाही.सदर बाबत मा.आयुक्त सो यांनी दिनांकः-25/11/2024 रोजी झालेल्या आढवा बैठकीत ज्या विभागास मजुरांची आवश्यकता असेल त्यांनी आपल्या विभागाची आवश्यक कार्यवाही संबधित विभागाकडुन करावी अश्या सूचना दिलेल्या आहेत.

सबब, **मा.महासभा [ प्रशासक ठराव क्र.113 ] दिनांकः-19/07/24 चा ठराव रदद करुन** अतिक्रमण निर्मुलन विभागास आवश्यक मनुष्यबळाची निविदा प्रकिया याविभागाकडुन करणे उचित होईल.तसेच कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, ई ब्लॉक,सी-20 वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे[पु]मुंबई यांचे कडुन दर सहा महीन्यानंतर प्रसिध्द होण्या-या मजुरांना दिला जाणारा किमान वेतन अधिनियम 1948 अंतर्गत प्रसिध्द पुस्तीका मधील अ.नं.49 मधील कामगाराची वर्गवारी [ पूर्ण कालिक सफाईगार किंवा मेहतर,तत्सम कामगार ] परीमंडळ 2 नुसार

मुळ वेतन 10,000 +**विशेष भत्ता** 6358 =16358 प्रति महीना इतका असुन

1 दिवसा करीता प्रति कामगार 629 इतके किमान वेतन येत आहे.

तरी 2024-25 करीता 35 मजुर करीता किमान वेतन कायदा 1948 नुसार रु. 629 प्रमाणे 35 कामगार साठी रु.22015/-प्रति रोज या प्रमाणे 26 दिवसा करीता [ 4 रविवार साप्ताहीक सुटी ] रु.72390 प्रति महीना या प्रमाणे 12 महीन्या करीता रु.6868680/-इतका खर्च अपेक्षित आहे.त्यावर 18 % GST रु.1,23,636/- असे एकुण-रु.69,92,316/-असा येत आहे.कंत्राटी मजुर व वाहने व इतर साहीत्य खरेदी हया हेडखाली सन.2024-25 करीता रु.70,00,000/- अशी बजेट तरतुद आहे.

C:\Users\...\Desktop\ई निविदा 24-25 मजुर पुरवठा निविदा.doc



Scanned with OKEN Scanner

(२)

ब सबब सोबत ई निविदा मसुदा अटी व शर्ती सुचना मान्य करुन ,स्वाक्षरीस्तव सादर,उपरोक्त ठराव रदद करुन याविभागास स्वतंत्रय ई निविदा प्रसिध्द करण्यांस मान्यता मिळणे,व 35 कामगारा साठी एक वर्षा करीता होणा-या रु. 69,92,316/-खर्चास मान्यता मिळनेस सादर. तरी सदर अहवाल मा.महासभेच्या पुढे ठेवणेच्या मान्यतेस्तव सादर

संजय बन्सी पवार[ठाकुर]
अतिक्रमण अधिक्षक

मा.सहा.आयुक्त सो

मा.उपायुक्त सो उपरोक्त 'अ' व 'ब' अन्वये मान्यतेस सादर.

05/12/24

3२४६
२८/११/२०२४

मु.ले.प

लेखापाल

मा. आयुक्त

आस्थापना विभाग अहवाल ठेवावा.

2.1.025

आस्थापना

C:\Users\...\Desktop\ई निविदा 24-25 मजूर पुरवठा निविदा.doc

**खाते - आस्थापना** **टिपणीपान क्र. :-०३**

दिनांक ०३ /०१/२०२४

**सविनय सादर**

जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर २१५७ पदे मंजुर असुन डिसेंबर २०२४ अखेर ८०७ पदे रिक्त आहेत. सन २०२४-२५ करीता अतिक्रमण निर्मुलन विभागास ३५ मजुरांची आवश्यकता असल्याने दि.२६/११/२०२४ चा प्रस्ताव म.उपायुक्त (महसुल) यांचेमार्फत म.मुख्य लेखा परिक्षक यांचेकडेस पाठविणेंत येऊन त्यांनी तपासणी केलेचे दिसुन येते. सदर प्रकरणी अतिक्रमण विभागामार्फत सादर केलेल्या दि.२६/११/२०२४ च्या अहवालावरील म.मु.ले.प.सो. यांचे अभिप्राय असुन ३५ मजुर मनुष्यबळ (बाहययंत्रणेव्दारे) १२ महिन्यांकरीता उपलब्ध करुन घेणेंस हरकत नाही. तथापी संबंधित मजुरांचे वेतनातुन नियमानुसार कपाती करणेची जबाबदारी अतिक्रमण विभागाची राहील.

03/01/2024

आस्थापना अधिक्षक

जळगावं शहर महागनगरपालिका,जळगांव

दि.3/1/25

म.उपायुक्त (सा.प्र.)

प्रस्तुत प्रकरणी अतिक्रमण विभागाने प्रस्तावित केलेप्रमाणे, मनपाकडील कार्यरत अपुरे मनुष्यबळ पाहता, आवश्यकतेनुसार निश्चित मासात घेता सदर विभागाने बाह्ययंत्रणेमार्फत ई निविदा द्वारे मजुर मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यास हरकत नाही. तथापी लेबर कॉन्ट्रॅक्ट व नियमान्वये शासनाने वेळोवेळी प्रसारित केलेल्या निर्देशांचे पालन करणे आवश्यक राहील. PF, ESIC नियमित शासनास भरणा करणे, IT, GST नियमित कपात करणे इ. अटी-शर्ती सह निविदा प्रक्रिया, करणे बाबत विभागाने दक्षता घ्यावी.

6.1.025

उप आयुक्त (सा.प्र.) जळगाव श.म.न.पा.जळगाव
स्विकृत आवक तारीख 06/01/25
सचिव पाठविल्याची तारीख 06/01/2025
आवक क्रमांक 5880

विभागी

06/01/25

अधिक्षक, अतिक्रमण

सविनय सादर,

**विषय**:- प्रशासक ठराव क्र.११३ दिनांक:-१९/०७/२०२४ अन्वये आस्थापना विभागा कामगारां संबधित ई-निविदा प्रक्रिया न राबविता अतिक्रमण निर्मुलन विभागामार्फत ई-निविदा प्र राबविणेस मान्यता मिळावी व याप्रमाणे सदर ठरावात बदल करणेस व अतिक्रमण निर्मुलन वि आवश्यकते प्रमाणे कामगारांसाठी ई निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी मान्यता मिळणे बा प्रस्ताव.

अतिक्रमण निर्मुलन विभागाकडेस सदयस्थितीत मनुष्य बळ कमी उपलब्ध असल्याने सन-२ २५ करीता सुध्दा अतिक्रमण निर्मुलन विभागास ३५ मजुरांची आवश्यकता असल्याने सदर मनुष्य बळ घेण मा. आयुक्त सो यांच्या दिनांक:-०८/०७/२०२४ रोजी ई निविदा मागविण्यास मान्यता दिलेली आहे.

त्याअनुषंगाने मनुष्यबळासाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी मा. महासभे आ.क्र/अति.नि.वि/२१/२०२४-२५ दिनांक:-०९/०७/२०२४ अन्वये प्रस्ताव सादर केला असता. मा. महासभा [ प्रशासक ठराव क्र.११३] दिनांक:-१९/०७/२०२४ अन्वये प्रस्ताव च्या अनुषंगाने पुढील निर्णय झा आहे." तथापी मनुष्यबळ पुरविणेबाबत उचित अभिकर्त्यांची नियुक्ती करणे उचित असल्याने सर्व विभागा मनुष्यबळ पुरविणेकामी निविदा प्रक्रिया ही सामान्य प्रशासन आस्थापना विभागामार्फत राबविणेत यावी. मागणी आस्थापना विभागाकडे नोंदवावी त्याच बरोबर ज्या ज्या विभागांना बाहययंत्रणे मार्फत पुरविणेत येणा मनुष्यबळाची आवश्यकता असेल. अशा सर्व विभाग व विभाग प्रमुख यांनी आवश्यक मनुष्यबळाच्या तपशील कुशल/अकुशल ] [ पदनाम व संख्या ]उपायुक्त [सा.प्र ] याचे कडेस मागणी नोंदवावी वआस्था विभागामार्फत बाहययंत्रणे मार्फत पुरविणेत येणा-या मनुष्यबळा संदर्भातील, नियम , शासन निर्णय , मार्गद तत्वे इ.बाबी विचारात घेवून निविदा प्रक्रिया राबवावी व निविदा प्रक्रिये संदर्भातील उचित व आवश्यक प्रस्ताव समक्ष प्राधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करावा व तदनंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करावी. तथ सदर निविदा प्रक्रिया अंतिम होईपावेतो प्रस्तुत अभिकर्त्यास मनुष्यबळ पुरविणेकामी मुदतवाढ देणेत आहे. नविन निविदा प्रक्रिया सा.प्र विभागाने नियमानुसार यशाशीघ्र अंतिम करणेची दक्षता घ्यावी. विभा वैधानिक कार्यवाही करावी."

अतिक्रमण विभागाकडुन आस्थापना विभागाकडेस मनुष्यबळ पुरवठाची दोन वेळा मागणी केले आहे तथापी अदयाप पावेतो वरील प्रक्रिया करुन आस्थापना विभागाकडुन सदर बाबत मनुष्यबळ उपलब्ध कर देणेत आलेले नाही. तरी अतिक्रमण विभागात मनुष्यबळ नसल्याने अतिक्रमण विभागाची कोणतीही कार्यवा प्रभावीपणे करता येत नाही. सदर बाबत मा. आयुक्त सो यांनी दिनांक:- २५/११/२०२४ रोजी झालेल्या आढा बैठकीत ज्या विभागास मजुरांची आवश्यकता असेल त्यांनी आपल्या विभागाची निविदा प्रक्रिया संबधि आवश्यक कार्यवाही संबधित विभागाकडुन करावी अश्या सूचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने प्रशासक ठराव क्रमांक-११३ दिनांक:- १९/०७/२०२४मध्ये पुढील बदल करणे आवश्य आहे. आस्थापना विभागात पुरेशा कर्मचारी वर्ग नसल्याने व अतिक्रमण विभागाकडेस कामगारांची आवश्यकत असल्याने बाहय यंत्रणे मार्फत पुरविणेत येणा-या मनुष्यबळाची आस्थापना विभागामार्फत निविदा प्रक्रिया राबविता ती निविदा प्रक्रिया ही अतिक्रमण विभागामार्फत नियमानुसार राबविणे आवश्यक आहे.

तथापि **मा. महासभा [ प्रशासक ठराव क्र.११३ ] दिनांक:- १९/०७/२०२४ अन्वये मा.आयुक्त सो. यां दि.०४/१२/२०२४ चे निर्देशानुसार निविदा प्रक्रिया राबविणे बाबत आस्थापना विभागाचा अभिप्राय मागवित असता तो पुढील प्रमाणे** " प्रस्तुत प्रकरणी अतिक्रमण विभागाने प्रस्तावित केलेप्रमाणे मनपाकडील कार्यरत अपु मन्युष्यबळ पाहाता, आवश्यकतेनुसार निकड लक्षात घेता सदर विभागाने ब्राहयंत्रणेमार्फत ई निविदा व्दारे मजु मन्युष्यबळ उपलब्ध करून घेण्यास हरकत नाही . तथापी लेबर ॲक्ट व नियमान्वये शासनाने वेळोवेळी प्रचलि केलेल्या निर्देशांचे पालन करणे आवश्यक राहील. PF , ESIC नियमित शासनास भरणा करणे, IT GST नियमित कपात करणे इ.अटी शर्तीसह निविदा प्रक्रिया करणे बाबत विभागाने दक्षता घ्यावी."

मुळ वेतन १०,००० +विशेष भत्ता ६३५८ = १६३५८ प्रति महीना इतका असुन १ दिवसा करीता प्रति कामगार ६२९ इतके किमान वेतन येत आहे.

तरी २०२४-२५ करीता ३५ मजुर करीता किमान वेतन कायदा १९४८ नुसार रु. ६२९ प्रमाणे ३५ कामगार साठी रु. २२०१५ /-प्रति रोज या प्रमाणे २६ दिवसा करीता [ ४ रविवार साप्ताहीक सुटी ] रु. ७२३९० प्रति महीना या प्रमाणे १२ महीन्या करीता रु. ६८६८६८०/-इतका खर्च अपेक्षित आहे. त्यावर १८ % GST रु. १,२३,२३६/- असे एकुण-रु. ६९,९२,३१६/-असा येत आहे. कंत्राटी मजुर व वाहने व इतर साहीत्य खरेदी हया हेडखाली सन. २०२४-२५ करीता रु. ७०,००,०००/- अशी बजेट तरतुद करण्यात आलेली आहे.

उपरोक्त मा. महासभा [ प्रशासक ठराव क्र. ११३ ] दिनांकः-१९/०७/२०२४ ठरावात आस्थापना विभागाकडुन निविदा प्रक्रिया न राबविता अतिक्रमण विभागामार्फत जाहिर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस तसेच लेबर ॲक्ट व नियमान्वये शासनाने वेळोवेळी प्रचलित केलेल्या निर्देशांचे पालन करून ~~आवश्यक पहील~~. PF , ESIC नियमित शासनास भरणा करणे IT, GST नियमित कपात करणे इ.अटी शर्तीसह निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी असा ठरावात बदल करणेस व त्याप्रमाणे अतिक्रमण विभागामार्फत स्वतंत्र ई निविदा प्रसिध्द करण्यांस मान्यता मिळणेस व ३५ कामगारा साठी एक वर्षा करीता होणा-या रु. ६९,९२,३१६/- खर्चास मा.प्रशासक सो/मा.महासभेची मान्यता मिळावी हि विनंती .

(स्वाक्षरी)
संजय बन्सी पवार[ठाकुर]
अतिक्रमण अधिक्षक

सहा. आयुक्त (स्वाक्षरी)

मा. उपायुक्त सो

उपरोक्त 'अ' नुसार मान्यतेस सादर.
(स्वाक्षरी) 07/01/24

मुलेखे

स.सादर
प्रस्तुत प्रकरणी मा. महासभा ठराव क्र ११३ दि. १९/०७/२ मध्ये उपलब्ध नमुद 'अ' प्रमाणे बदल करणेस व मजुर पुरवठा करता येणारा अंदाजित खर्चास मान्यतेचा प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेस्तव सादर.

(स्वाक्षरी) 07/01/20..
लिपिक
रोहित ओडे

(शिक्का) 3622 07/01/2025

मा. मुलेखे (स्वाक्षरी) 9/1/25

(स्वाक्षरी) 9/1/2025
मा. अतिक्रमण

Scanned with OKEN Scanner

# जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव.

अतिक्रमण निर्मुलन विभाग

दिनांक:-16/01/2024

---

सविनय सादर,

मा.महासभा ठराव क्र.224 दिनांक:-15/01/2025 अन्वये अतिक्रमण निर्मुलन विभागाने मजुर पुरवठा करण्याच्या ई निविदा प्रसिध्द करण्यांस मान्यता देण्यांत आली आहे. **त्यानुसार मक्तेदार यांचे कडुन मजुर पुरवठयाकामी सेवा शुल्क मागविण्यांस**, ई निविदा प्रसिध्दी कामी ई टेंडर मसुदा तपासुन त्यावर स्वाक्षरीस्तव तसेच ई निविदा प्रसिध्दी,प्रसिध्दीसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेसाठी सादर .

संजय बन्सी पवार[ठाकुर]
अतिक्रमण अधिक्षक

मा.उपायुक्त सो

20/01/25

मा. मुलेप

सादर,
उपरोक्त नमुद प्रमाणे अतिक्रमण विभागाकरिता मजुर पुरवठाकामी ई-निविदा सूचना प्रसिद्ध करणेस व प्रसिद्धीस येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत कार्यवाहीस्तव सादर.

20/01/2025
(लेखापरीक्षक)

मा. मुलेप

चर्चा केली
चर्चे प्रमाणे सुधारणा करावी

23.1.25

विभाग

P.T.O



C:\Users\Thakur\Desktop\ई निविदा 24-25 मजुर पुरवठा निविदा.doc

अतिक्रमण निर्मुलन विभाग

# जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव

दिनांक:-03/02/2025

---

सविनय सादर,

**मा.मुख्य लेखा परीक्षक यांच्याशी झालेल्या चर्चेअंती फेर सादर**

**विषय:-** प्रशासक ठराव क्र.224 दिनांक:-15/01/2025 अन्वये अतिक्रमण निर्मुलन विभागात आवश्कते प्रमाणे कामगारांसाठी ई निविदा प्रकिया राबविणे कामी येणा-या अंदाज प्रत्रिकीय रु.69,92,316/- खर्चात, भविष्य निवार्ह निधी, ई एस.आय.सी ,बोनस ,ग्रॅज्युईटी , किरकोळ रजा ,गणवेश/पावसाळी साहीत्य वाटप करणे,Workmen compensation Insurancr व इतर खर्च , असे एकुण 34.61 % साठी होणारी जादा वाढ रु.53,96,445/-व एकुण येणा-या खर्चास रु.1,23,88,761/-च्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

अतिक्रमण निर्मुलन विभागाकडेस सदयस्थितीत आस्थापणा सुचिवरील मनुष्यबळ कमी असुन सन 2024-25 करीता अतिक्रमण निर्मुलन विभागास 35 मजुरांची आवश्यकता असुन मक्तेदारा मार्फत मनुष्यवळ घेणे कामी मा.महासभा तथा प्रशासक यांचे समोर प्रस्ताव सादर करण्यांत आलेला असता मा.महासभा/प्रशासकिय ठराव क्र.224 दिनांक:-15/01/2025 रोजी रु. 69,92,316/-खर्चास व ई निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळाली आहे.

**मा.मुख्य लेखा परीक्षक यांच्याशी झालेल्या चर्चेअंती निविदे मध्ये व अंदाज पत्रकामध्ये बदल करण्यांच्या सुचना** देण्यांत आल्या नुसार **सुधारीत** अंदाजपत्रकीय **खर्च खालील प्रमाणे आहे.**

मा.कामगार आयुक्त यांचे कार्यालय,कामगार भवन,ई ब्लॉक,सी-20 वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे [ पु ] मुंबई यांचे कडुन दर सहा महीन्यानंतर प्रसिध्द होणा-या मजुरांना दिला जाणारा किमान वेतन अधिनियम 1948 अंतर्गत प्रसिध्द पुस्तीका मधील अ.नं.49 मधील कामगारांची वर्गवारी [ पुर्ण कालीक सफाई कामगार किंवा मेहतर,तत्सम कामगार ] परीमंछळ 2 नुसार मुळ वेतन रु.10,000+विशेष भत्ता रु.6358 = रु.16,358/- प्रति महीना इतका असुन,प्रति कामगार रु.629/- +, [ भविष्य निवार्ह निधी - 12.36 % , ई एस.आय.सी -3.25 % , बोनस -8.33 % , ग्रॅज्युईटी – 4.00 % , किरकोळ रजा -1.00 % ,गणवेश/पावसाळी साहीत्य वाटप करणे -4.00 % , Workmen compensation Insurancr व इतर खर्च -1.67 % ] असे एकुण 34.61 % त्यांची लेव्हीची रक्कम रु.217/- + अंदाजित सेवा शुल्क रु.66 /-असे एकुण 909/-रु इतका खर्च अपेक्षित आहे..

त्यानुसार 35 कामगारांसाठी प्रति दिवस रु.31,815/-, प्रति महीना रु.9,54,450/-,असे एकुण 11 महीन्या करीता रु.1,04,98,950/- होते त्यावर 18 % GST रु.18,89,811/- असे एकुण रु.1,23,88,761/- असा खर्च येत आहे.

मात्र मा.प्रशाकिय ठराव क्र.224 दिनांक:-15/01/2025 रोजी अंदाज प्रत्रिकीय रु.69,92,316/-खर्चास मान्यता मिळाली आहे उपरोक्त एकुण 34.61 % देयकात होणारी अतिरिक्त वाढ रु.53,96,445/-येणार आहे.मान्यता मिळालेली रक्कम रु.69,92,316/- व जादा होणारी वाढ रु.53,96,445/- अशी एकुण रु.1,23,88,761/- खर्चास मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.सबब अतिक्रमण निर्मुलन विभागाकडील कंत्राटी मजुर व वाहने व इतर साहीत्य खरेदी हया हेडखाली सन-2024-25 करीता रु. रु.1,23,88,761/-अशी बजेट तरतुद करणेस मान्यता मिळणेस व ई निविदा प्रसिध्द करण्यांस तसेच ई निविदा मसुदा स्वाक्षरीस्तव,मान्यतेस्तव सादर

संजय बन्सी पवार
अधिक्षक

मा.सहा.आयुक्त

मा.उपायुक्त

उपरोक्त प्रस्तावित बाबत मा. मुख्य लेखा परीक्षक यांचेशी चर्चा झाले नुसार मंजूर कामात

C:\Users\...\Desktop\ई निविदा 24-25 मजुर पुरवठा निविदा.doc

वाढीव अंदाजपत्रकीय तरतूद करणेस मान्यता मिळणे तसेच तत्पूर्वी सदर निविदा प्रसिद्ध करणेस मान्यता मिळणेकामी मा. महासभा तथा मा. प्रशासक यांचेकडे सादर.

07/02/25
(धनश्री शिंदे)
उपायुक्त (महसूल)
जळगाव महानगरपालिका.

मुलेप
7.2.25

कामी
महासभेपुढे ठेवा.
मा. आयुक्त

**जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव**
अतिक्रमण निर्मुलन विभाग

जा.क्र/अति.नि.वि./ 07 /2025-26

दिनांक:-21/ 05 / 2025

## कार्यादेश

प्रति,
रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड सर्व्हीसेस,
जळगांव

**विषय:-** अतिक्रमण निर्मुलन विभागास आवश्यकतेनुसार कामगारांचा पुरवठा करणे बाबत...
**संदर्भ :-** मा.स्थायी समिती [ प्रशासक ] क्र.255 दिनांक :-30/04/2025

उपरोक्त संदर्भिय ठरावाच्या मान्यतेने आपण दिलेले मजुर पुरवठा सेवा शुल्क दर रु.1.000/- [ एक रुपया ] मात्रचे दर मंजुर करण्यांत आलेले आहे.सदर मंजुर दरानुसार व आपण करुन दिलेल्या करारनामा अटीशर्तीनुसार अतिक्रमण निर्मुलन विभागास 25 मजुर पुरवठा करण्याची कार्यवाही करावी व पुरविलेल्या मजुरांची मासिक हजेरी अहवाल अधिक्षक,अतिक्रमण निर्मुलन विभाग यांचे कडे सादर करावा.सदरचा पुरवठा करतांना निविदा मधील अटी शर्तीचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.सदरचा कार्यादेश हा 11 महीन्यासाठी राहील.सदर मजुरांचा पुरवठा दिनांक :- 01/06/2025 पासुन करण्यात यावा

[ धनश्री शिंदे ]
उप-आयुक्त
जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव

मा.माहीतीस्तव सविनय सादर
मा.आयुक्त तथा प्रशासक

Rapid Security & Labour Services Jalgaon

Rapid Security ...

Scanned with OKEN Scanner

जळगाव शहर महानगरपालिका जळगाव
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax - 2222260

सभा क्र. ४७

(स्थायी समिती)

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:- २५५** **दिनांक :-३०/०४/२०२५**

वाचा :-

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. अतिक्रमण अधिक्षक, अतिक्रमण निर्मुलन विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./अति.नि.वि./०५/२०२५-२६ दि.२९/०४/२०२५
३. उपायुक्त यांचा दि.०८/०४/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२८/०४/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.२८/०४/२०२५ चा अभिप्राय

विषय :- सेवा शुल्क रक्कम स्विकारणे, करारनामा करणे तसेच कार्यादेश देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व अतिक्रमण अधिक्षक, अतिक्रमण निर्मुलन विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अतिक्रमण निर्मुलन विभागास आवश्यकतेनुसार मनुष्यबळ पुरवठयाकामी आयुक्त यांनी दि.०७/०२/२०२५ रोजी मान्यता दिली असता त्या अनुषंगाने दि.१४/०२/२०२५ रोजी ई निविदा प्रसिध्द केली असता मुदतीत चार निविदा धारकांनी वेळेत ई निविदा भरली. उपायुक्त यांचे मान्यतेने लिफाफा क्र.१ (तांत्रिक कागद) उघडण्यांत आला त्यात तिन निविदा धारकांचे कागदपत्रांची अपुर्णता पाहता कमी असलेले कागदपत्रे सादर करणेसाठी शॉट फॉल दिला असता तिन पैकी एक निविदा धारकाने मुदतीत कागदपत्रांची पुर्तता केली नाही. उर्वरीत निविदा धारकांनी कागदपत्रांची पुर्तता केल्याने

१. ओम साई असोसिएट,पुणे
२. रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव
३. सान्वी मल्टी सर्व्हीसेस,लातुर

हे तिन निविदा धारक हयांनी कागदपत्रांची पुर्तता व छाननी अंती त्यांना पात्र करण्यात आले असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | प्राप्त दर (प्रति कामगार सेवा शुल्क) |
|---|---|---|
| १ | ओम साई असोसिएट,पुणे | १.००० L - २ |
| २ | रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव | १.००० L - २ |
| ३ | सान्वी मल्टी सर्व्हीसेस,लातुर | ०.००१ L - १ |

उपरोक्त दर प्राप्त झाले असता निविदा समिती सदस्य यांनी निविदा अटी शर्तीचे वाचन केले असता L - १ आलेले निविदाधारक सान्वी मल्टी सर्व्हीसेस,लातुर यांनी निविदेतील लिफाफा क्र.२ (आर्थिक लिफाफा) यामध्ये नमुद टीप - "केवळ प्रति दिन प्रति कामगार सेवा शुल्क रक्कम नमुद करावी सदर रक्कम ही पुर्णांकात असावी." यानुसार दर भरले नसल्याने त्यांचे दर अपात्र करण्यांत आलेले आहे.

Scanned with OKEN Scanner

उर्वरीत १- ओम साई असोसिएट,पुणे, २- रॅपिड सिक्युरिटी अॅण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव हे L-१ असल्याने त्यांनी दिलेले दर हे समान असल्याने निविदा समितीच्या मान्यतने दि.२७/०३/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता उपायुक्त, महसुल यांचे कार्यालयात वाटाघाटी व योग्य निर्णयासाठी बोलविण्यात आले असता सदर मिटींग मध्ये उपरोक्त दोन्ही निविदा धारकांचे प्रतिनिधी तसेच निविदा निवड समिती सदस्य यांच्या चर्चेअंती साक्षीदार यांचे उपस्थितीत ईश्वर चिठ्ठी काढण्यांत आली त्यात निविदाधारक रॅपिड सिक्युरिटी अॅण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव यांची चिठ्ठी निघाल्याने त्यांनी दिलेले सेवाशुल्क दर रु.१.०००/- (एक रुपया) स्विकारण्यांत आले.

सबब रॅपिड सिक्युरिटी अॅण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव यांनी दिलेले सेवाशुल्क दर रु.१.०००/- (एक रुपया) स्विकारण्यांस तसेच त्यांचेकडुन करारनामा करण्यांस, तसेच त्यांना सन-२०२५-२६ करीता ३५ मजुर पुरविण्यांसाठी कार्यादेश देणेस मान्यता मिळण्यासाठी अतिक्रमण अधिक्षक, अतिक्रमण निर्मुलन विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

JALGAON CITY MUNICIPAL CORPORATION JALGAON
जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

(सही)
(मनोजकुमार ढेरे)
प्रशासक
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

महाराष्ट्र MAHARASHTRA 2025

## // करारनामा //

| | | |
|---|---|---|
| जळगाव शहर महानगरपालिका तर्फे<br>उपायुक्त,<br>(आयुक्त करीता)<br>१७.मजली प्रशासकिय इमारत,नेहरुचौक,जळगाव | } | लिहुन घेणार<br>[ प्रथम पक्ष ] |
| आणि | | |
| रॅपिड सिक्युरिटी ॲन्ड लेबर सर्व्हिसेस, जळगांव<br>प्रो.प्रा.श्री.भगवान पाटील वय- ५७<br>पत्ता- प्लॉट नं.२१ समर्थ कॉलनी पिप्रांळा,जळगांव | } | लिहुन देणार<br>[ व्दितीय पक्ष ] |

ज्या अर्थी प्रथम पक्ष अतिक्रमण विभागाकडेस आवश्यकते नुसार मजुर कामगारांचा पुरवठा करणे कामास मा.प्रशासक ठराव क्रं.२२४ दिनांक १५/०१/२०२५ रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे. व मा.आयुक्त सो. यांची दिनांक ०७/०२/२०२५ नुसार सदर कामी दिनांक १५/०२/२०२५ चे.दै. पुण्यनगरी या वृत्तपत्रामध्ये ई निविदा सुचना प्रसिध्द करुन प्रति कामगार प्रतिदिन सेवाशुल्क दर मागविले असता माझे दर रक्कम रु.१.०० प्रति कामगार प्रतिदिन सेवाशुल्क सर्वात कमी आले असता सदर दर वाजवी व योग्य आहे.

..| २ |..

Scanned with OKEN Scanner

जोडपत्र-२

करारनामा

रॅपिड सिक्युरीटी ॲन्ड लेबर सर्विस

५००/-

६/५/२०२५

२६८८

चेतन कोळी

किशोर पंडीत मराठे

परवाना धारक मुद्रांक विक्रेता

कार्यालय आवार, ...

ज्यांनी मुद्रांक खरेदी केला ...

... केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधन

..[ २ ]..

आणि, ज्या अर्थी सदर कामा संबंधात महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या ई निविदा पैकी आलेले दर मक्तेदार रॅपिड **सिक्युरिटी ॲन्ड लेबर सर्विसेस, जळगांव** यांचे प्रति कामगार प्रतिदिन सेवाशुल्क सर्वात कमीचे आलेले दरास प्रशासक ठराव क्रं. २५५ दि. ३०/०५/२०२५ अन्वये समक्ष प्राधिकरणाने मान्यता प्रदान केलेली असुन संविदा करण्यास प्राधिकृत केले आहे.

आणि ज्या अर्थी निविदा सुचनेत नमुद अटी शर्ती नुसार सोवतच्या परिशिष्टात नमुद अटी शर्ती उभय पक्ष यांना मान्य आहेत.

त्या अर्थी सदरु बाबीचे द्योतक म्हणुन उभयपक्ष निम्न स्वाक्षांकित साक्षिदारांच्या उपस्थितीत सदर संविदा स्वाक्षांकित करीत आहे व त्यावर महानगरपालिकेची सामान्य मुद्रा उमटविण्यात येत आहे.

स्थळ :- जळगाव

दिनांक:- १३/०५/२०२५



लिहुन घेणार

**उपायुक्त** (आयुक्त करीता)

जळगाव शहरमहानगरपालिका, जळगाव.

लिहुन देणार

मक्तेदार

रॅपिड सिक्युरिटी ॲन्ड लेबर सर्विसेस, जळगाव

**उभ्य पक्षानी आमचे समक्ष स्वाक्षरी केली.**

**साक्षीदार :-** **१) संपुर्ण नांव व पत्ता:-** गोकुळ नारायण ... स्वाक्षरी ----------

**२) संपुर्ण नांव व पत्ता:-** ---------------------------- स्वाक्षरी ----------------

उपरनिर्दिष्ट करारनाम्यास जळगांव शहर महानगरपालिकेची सामान्य मुद्रा या दोन्ही अधिकाऱ्यांच्या उपस्थित प्रतिबिंबित करण्यात आली असे

| **संबंधित अधिकारी यांचे नांव** | स्वाक्षरी |
|---|---|
| १) धनश्री शिंदे | १) ---------- |
| २) शाम विठ्ठल ... | २) ---------- |

Scanned with OKEN Scanner

# परिशिष्ठ

## अटी व शर्ती

**कामाचे नांव:- अतिक्रमण निर्मुलन विभागाकडेस आवश्यकते प्रमाणे कामगारांचा पुरवठा करणे बाबत.**

१.मक्तेदाराने नेमलेल्या कामगारांना किमान वेतनानुसार पगार देणे बंधनकारक राहील.मजुरांची कामाची वेळ सकाळी ९ ते सध्यांकाळ ६ पर्यंत राहील.

२. मक्तेदाराने कंत्राटी कामगारांचा विमा/ शासकिय विमा निधी कार्यालयाकडेस उतरविणे अनिवार्य आहे.त्यांचा पुरावा सादर न केल्यास एकुण विमा रकमेच्या कंत्राटी देय रकमेतुन १ % रक्कम पहील्या बिलातुन कपात केली जाईल. I.T. , GST ची नियमानुसार कपात देयकातुन केली जाईल.

३.दिलेल्या कामात अनियमीतता आढळुन आल्यास आणि वारंवार सुचना देऊन सुद्धा कामात सुधारणा होत नसल्याचे दिसुन आल्यास पुर्व नोटीस देऊन संपुर्ण अनामत रक्कम जप्त करून मक्ता रद्द करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

४.अतिक्रमण विभागाकडुन होणाऱ्या कार्यवाही अंतगर्त काम करीत असतांना मजुरांना काही हानी,अपघात इ.होवुन जिवीत वा वित्त हानी झाल्यास त्यांची नुकसान भरपाई करणेची सर्वस्वी जबाबदारी मक्तेदार यांची राहील.

५.एखादे दिवशी कामगार उपलब्ध न झाल्यास पर्यायी कामगारांची व्यवस्था मक्तेदार यांना करावी लागेल.

६.अतिक्रमण निर्मुलन विभागाकडून आवश्यकते नुसार कामगार संख्या कमी किंवा जास्त पुरवठा बाबत आदेश मिळालेनंतर मजुरांचा पुरवठा करावा लागेल.मागणीनुसार मजुर न पुरविल्यास प्रति मजुर रु.७००/-दंड आकारण्यात येईल.

७.देयक अदा करणेस विलंब झाल्यास व्याज वा अतिरिक्त रक्कमेची मागणी मक्तेदाराला करता येणार नाही.

८.किमान वेतन कायदयातील तरतुदीनुसार वेतन कामगारांना देण्यांत येईल व त्यात वेळोवेळी होणा-या बदलानुसार देयकात वाढ देय राहील.

९.यशस्वी निविदा धारकास अस्तित्वात असणा-या सर्व नियम,कायदयांचे पालन करणे बंधनकारक राहील

१०.आपतकालीन किंवा कोणत्याही आचार सहीता कालावधीत मुदतवाढ देण्यांचे अधिकार मा. आयुक्त, म.न.पा.जळगांव यांना असेल.

११.कर्मचारी यांची ओळख पटविणेसाठी त्यांना गणवेश व ओळखपत्र बंधनकारक राहील.

१२.पुरवण्यात येणा-या मजुरांचे चारीत्र्य प्रमाण पत्र देणे बंधनकारक राहील.

१३.भविष्य निर्वाह निधी कायदा,बोनस अॅक्ट,ग्रॅज्युईटी अॅक्ट,ई.एस.आय.सी.किमान वेतन कामगार कायदयाचे अॅक्ट इ.कायदयांन्वये देय असलेली खालील प्रमाणे ३४.६१% लेव्हीची रक्कम कामगारांना देणे अभिकर्त्यास बंधनकारक राहील.तसेच कामगारांच्या वेतनात वेळोवेळी होणारी वाढ व त्यावरील ३४.६१% लेव्हीची रक्कम [ मुळ वेतन+विशेष भत्ता ] नुसार अभिकर्त्याला मनपा मार्फत अदा करण्यांत येईल तसेच अन्य प्रचलित कायदयाचे काटेकोरपणे पालन करणेची जबाबदारी अभिकर्त्यावर राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | भविष्य निर्वाह निधी | १२.३६ % |
| २ | ई.एस.आय.सी. | ३.२५ % |
| ३ | बोनस | ८.३३ % |
| ४ | ग्रॅज्युईटी | ४.०० % |
| ५ | किरकोळ रजा | १.०० % |
| ६ | गणवेश/पावसाळी साहीत्य वाटप करणे | ४.०० % |
| ७ | Workmen compensation Insurancr व इतर खर्च | १.६७ % |
| | एकुण | ३४.६१. % |



7

Scanned with OKEN Scanner

१४.निविदाकाराने नेमलेले कामगार हे महानगरपालिकेचे कामगार म्हणुन हक्क सांगणार नाहीत व त्यांना मनपा सेवेत सामावून घेतले जाणार नाही. त्यांना व त्यांच्या नातेवाईकांना / कुटुंबियांना वारसा हक्क सांगता येणार नाही.

१५. निविदाकारांनी नेमलेल्या कामगाराचा पगार, रजा व इतर सवलती इत्यादी बाबींची सर्व जबाबदारी कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट १९७० व कॉन्ट्रॅक्ट लेबर नियम १९७१ अन्वये निविदाकाराची राहील तसेच कामगार मा.आयुक्त कार्यालयाचे आवश्यक ते परवाने घेण्याची जबाबदारी.निविदाकार यांचेवर राहील.

१६.निविदाकार व जशमनपा यामध्ये काही वाद निर्माण झाल्यास यासंबधी अंतिम निवाडा देण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्तांना असेल.

१७.निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यानंतर Professional Tax Certificate PF,E.S.I.C.[ Employs state Insurance certificate ] व इतर आवश्यक प्रचलीत शासकिय नियमानुसार वेळोवेळी घ्यावे लागणारे नोंदणी प्रमाणपत्र परवाने विवरण पत्रके दाखल करणे त्या त्या संबधित कार्यालयाकडुन स्वतः च्या जबाबदारी घ्यावे लागतील किंवा अनुज्ञप्ती घेवुन त्यांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

१८.निविदाकारास बालमजुरांना कामावर ठेवता येणार नाही .याकरीता कामगारांचे जन्म तारखेचा पुरावा घेणे बंधनकारक राहील The child Labor [Prohibiton @ Regular ] Act १९८६ नुसार बालमजुर कामावर असल्याचे आढळून आल्यास कायदेशिर कारवाई करण्यांत येईल.

१९.भविष्य निर्वाह निधीची रक्कम व इ.एस.आय.सी.ची रक्कम दरमहा शासनाच्या संबंधित विभागाकडे भरणा केल्याचा पुरावा सादरकरणे बंधनकारक राहील .त्या शिवाय पुढील महिन्याचे देयक तयार करण्यात येणार नाही.

२०.निविदाकारास कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव करून दिलेल्या करारनाम्यात बदल करता येणार नाही.बदल करण्याचा अधिकार मा.आयुक्त,महानगरपालिका,जळगाव यांचा असेल.

२१.कोणत्याही कारणस्तव निविदाकार यांनी कामगार बंद केले अगर काम सोडून दिले अशा प्रसंगी सुरक्षा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा.आयुक्त मनपा जळगांव यांना राहील.

२२.मक्तेदार व महापालिका यामध्ये काही वाद निर्माण झाल्यास यासंबधी अंतिम निवाडा देण्याचा अधिकार मा.आयुक्तांना असेल उच्च न्यायालयीन अधिकार क्षेत्र औरंगाबाद खंडपीठ हे राहील.

२३.शासकिय लेखा परीक्षणात काही आक्षेप निघाल्यास त्यांचे निराकरण करणे अथवा वसुलीची रक्कमभरणे मक्तेदारास बंधन कारक राहील.

२४.वरील नियम अटी व शर्ती मी/आम्ही काळजी पूर्वक वाचलेले असून त्या मला/आम्हाला पूर्णपणे मान्य असून आमचेवर बंधनकारक आहे.

२५ ज.श.म.न.पा. सांगेल त्या ठिकाणी [illegible]

| | |
|---|---|
| लिहुन घेणार | लिहुन देणार |
| उपायुक्त (आयुक्त करीता)<br>जळगाव शहरमहानगरपालिका,जळगाव. | मक्तेदार<br>रॅपिड सिक्युरिटी ॲन्ड लेबर सर्व्हिसेस, जळगाव |

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax - 2222260


सभा क्र. ४७

(स्थायी समिती)

विषय क्र.:-०२

प्रशासक ठराव क्र.:- २५५ दिनांक :-३०/०४/२०२५

वाचा :-

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. अतिक्रमण अधिक्षक, अतिक्रमण निर्मुलन विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./अति.नि.वि./०५/२०२५-२६ दि.२९/०४/२०२५
३. उपायुक्त यांचा दि.०८/०४/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२८/०४/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.२८/०४/२०२५ चा अभिप्राय

विषय :- सेवा शुल्क रक्कम स्विकारणे, करारनामा करणे तसेच कार्यादेश देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व अतिक्रमण अधिक्षक, अतिक्रमण निर्मुलन विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलन ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अतिक्रमण निर्मुलन विभागास आवश्यकतेनुसार मनुष्यबळ पुरवठयाकामी आयुक्त यांनी दि.०७/०२/२०२५ रोजी मान्यता दिली असता त्या अनुषंगाने दि.१४/०२/२०२५ रोजी ई निविदा प्रसिध्द केली असता मुदतीत चार निविदा धारकांनी वेळेत ई निविदा भरली. उपायुक्त यांचे मान्यतेने लिफाफा क्र.१ (तांत्रिक कागद) उघडण्यांत आला त्यात तिन निविदा धारकांचे कागदपत्रांची अपुर्णता पाहता कमी असलेले कागदपत्रे सादर करणेसाठी शॉट फॉल दिला असता तिन पैकी एक निविदा धारकाने मुदतीत कागदपत्रांची पुर्तता केली नाही. उर्वरीत निविदा धारकांनी कागदपत्रांची पुर्तता केल्याने

१. ओम साई असोसिएट,पुणे
२. रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव
३. सान्वी मल्टी सर्व्हीसेस,लातुर

हे तिन निविदा धारक हयांनी कागदपत्रांची पुर्तता व छाननी अंती त्यांना पात्र करण्यात आले असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | प्राप्त दर (प्रति कामगार सेवा शुल्क) |
|---|---|---|
| १ | ओम साई असोसिएट,पुणे | १.००० L - २ |
| २ | रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव | १.००० L - २ |
| ३ | सान्वी मल्टी सर्व्हीसेस,लातुर | ०.००१ L - १ |

उपरोक्त दर प्राप्त झाले असता निविदा समिती सदस्य यांनी निविदा अटी शर्तीचे वाचन केले असता L - १ आलेले निविदाधारक सान्वी मल्टी सर्व्हीसेस,लातुर यांनी निविदेतील लिफाफा क्र.२ (आर्थिक लिफाफा) यामध्ये नमुद टीप - "केवळ प्रति दिन प्रति कामगार सेवा शुल्क रक्कम नमुद करावी सदर रक्कम ही पुर्णांकात असावी." यानुसार दर भरले नसल्याने त्यांचे दर अपात्र करण्यांत आलेले आहे.

Scanned with OKEN Scanner

उर्वरीत १- ओम साई असोसिएट,पुणे, २- रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव हे असल्याने त्यांनी दिलेले दर हे समान असल्याने निविदा समितीच्या मान्यतने दि.२७/०३/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता उपायुक्त, महसुल यांचे कार्यालयात वाटाघाटी व योग्य निर्णयासाठी बोलविण्यात आले असता सदर मिटींग मध्ये उपरोक्त दोन्ही निविदा धारकांचे प्रतिनिधी तसेच निविदा निवड समिती सदस्य यांच्या चर्चेअंती साक्षीदार यांचे उपस्थितीत ईश्वर चिठ्ठी काढण्यांत आली त्यात निविदाधारक रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव यांची चिठ्ठी निघाल्याने त्यांनी दिलेले सेवाशुल्क दर रु.१.०००/- (एक रुपया) स्विकारण्यांत आले.

सबब रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव यांनी दिलेले सेवाशुल्क दर रु.१.०००/- (एक रुपया) स्विकारण्यांस तसेच त्यांचेकडुन करारनामा करण्यांस, तसेच त्यांना सन-२०२५-२६ करीता ३५ मजुर पुरविण्यांसाठी कार्यादेश देणेस मान्यता मिळण्यासाठी अतिक्रमण अधिक्षक, अतिक्रमण निर्मुलन विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

JALGAON CITY MUNICIPAL CORPORATION • JALGAON • जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

(ज्ञानेश्वर ढेरे)
प्रशासक
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

Scanned with OKEN Scanner